हेड्विग
मीडिया हाऊस

सर्वज्ञ

दिवाळी अंक
२०२४
रामायण विशेषांक



₹२४०

सर्वज्ञ

दिवाळी २०२४

रामायण विशेषांक

हेड्विग मीडिया हाऊस

संपादक:-

चिन्मय पंडित

कार्यकारी संपादक:-

स्वप्ना केळेकर-अणावकर

संपादन सहाय्य:-

पल्लवी गाडगीळ आणि हेड्विग मीडिया हाऊस टीम

मुखपृष्ठ व आतील चित्रे:-

संतोष घोंगडे

मुद्रण:-

दीपक मल्टी ऑफसेट, पुणे-३७

किंमत - २४०/-

रामायण आणि श्रीलंका

– डॉ. सच्चिदानंद शेवडे /३८

रामादी बंधू

– अलका मुतालिक /४३

महर्षी वाल्मिकी रचित रामायण महात्म्य

– प्रा. डॉ. सुभाष पवार /४७

भरत भेट आणि राम-जाबाली संवाद

– शरद कुबेर /५४

"पुर्णायुः मानुषेपि.."
श्रीराम आणि काळ यांच्या भेटीतील गूढ

– आदित्य शेंडे /६०

लक्ष्मण धूमकेतू- रामायण कालनिश्चितीचा पाया

– निलेश ओक – अलका गोडबोले /६८

"...रामदासेन लिखितं वल्मिकिरामायणं"
श्री रामदास स्वामींच्या हस्ताक्षरातील वाल्मिकीरामयणाचा परिचय

– डॉ. निलेश जोशी /७४

आग्नेय आशियातील रामकथा

– डॉ. अंबरीष खरे /८१

“...रामदासेन लिखितं वाल्मिकिरामायणं”

रामदास स्वामींच्या हस्ताक्षरातील वाल्मिकी रामयणाचा परिचय

– डॉ. निलेश जोशी

प्रास्ताविक –

रामकथा ब्रह्मांड भेदून | पैलाड न्यावी ||

रामकथा केवळ आप्तस्वकीयांना सांगावी असे नव्हे तर ती सर्वत्र प्रसृत करून साऱ्या ब्रह्मांडात पसरावी असे प्रतिपादन करणाऱ्या श्रीसमर्थ रामदास स्वामींनी नाशिक जवळील टाकळी येथे आपल्या तपश्चर्येच्या काळात शके १५४४ ते १५७१ म्हणजे इसवी सन १६२२ ते १६४९ या २७ वर्षांच्या कालखंडात वाल्मीकिरामायणाची पोथी स्वहस्ते लिहून काढली. त्यातील बालकांडाचा तौलनिक अभ्यास मांडणारा लेख नोव्हेंबर २०१२ मध्ये प्रकाशित झालेला असून या प्रस्तुत लेखात अयोध्याकांड व दाक्षिणात्य वाल्मीकिरामायणाची आवृत्ती यांची तुलना करून सर्ग संगती, सर्गसंख्या, श्लोकसंख्या, सर्गनावे, सर्गांची वैशिष्ट्ये, साम्य व भेद स्थळे तपासून श्रीसमर्थांनी ही पोथी लिहिताना दाक्षिणात्य आवृतीचा आधार घेतला होता का याचा शोध

घेणे हा उद्देश आहे.

वाल्मीकिरामायणाच्या उपलब्ध शाखा -

वाल्मीकीरामायणाच्या भारतात उत्तरभारतीय व दाक्षिणात्य अशा दोन मुख्य शाखा आढळतात. या दोन शाखांमध्ये नेपाळी, मैथिली, बंगाली, शारदा, देवनागरी तेलगू, ग्रंथ व मल्ल्याळम या भाषा व लिपींतील हस्तलिखितांचा समावेश होतो. यांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे

- **उत्तरभारतीय शाखा**

१. पूर्वोत्तरशाखा-
नेपाळी, मैखिली, बंगाली, देवनागरी

२. पश्चिमोत्तरशाखा- शारदा, देवनागरी

३. पश्चिमशाखा- देवनागरी

- **दाक्षिणात्य शाखा**

o तेलगू

o मल्ल्याळम

o ग्रंथ

o देवनागरी

साधारणपणे देवनागरी हस्तलिखिते सर्वच शाखांमध्ये आढळून येतात. प्रस्तुत ठिकाणी दाक्षिणात्य शाखेचा विचार केला आहे. तिलक, शिरोमणी व भूषण या तीन संस्कृत टीकांचा आधार घेऊन हा तौलनिक अभ्यास मांडला आहे. याशिवाय पुढील आवृत्त्यांचा देखील विचार केला आहे.

- **दाक्षिणात्य शाखा-**

- वाल्मीकिरामायणम्, अयोध्याकाण्डम्, द्वितीयभागः, तिलक-शिरोमणि-भूषणटीकायुक्तम्, परिमलप्रकाशनम्, देहली, २००८

- वाल्मीकिरामायणम्, प्रथमखण्डः, गीताप्रेस गोरखपुर, सं.२०६७

- वाल्मीकिरामायणम्, अयोध्याकाण्डम्, खेमराज श्रीकृष्णदास, श्रीवेङ्कटेश्वर मुद्रणालय, शके

- श्रीरामायण, अयोध्याकाण्ड, द्वितीयभाग, स्वाध्याय मण्डल, पारडी, सन.१९६७

श्रीसमर्थांच्या हस्तलिखित अयोध्याकांडाचे स्वरूप व लेखनकाल –

श्रीसमर्थांनी लिहिलेल्या या पोथीचा आकार १०.६"x ६" असून लिखित मजकुराचा आकार ८.९"x ४" इतका आहे. या हस्तलिखिताच्या पुष्पिकेत विरोधी नाम संवत्सर, फाल्गुन कृष्ण ७ शके १५७१ असा कालखंड नमूद केला आहे. यानुसार इसवीसन १६४९ मध्ये हे अयोध्याकांड लिहून पूर्ण झाले हे स्पष्ट आहे. पण बालकांड इसवीसन १६२२मध्ये पूर्ण झाल्याचा उल्लेख आहे. यावरून हे स्पष्ट होते की अयोध्याकांड बालकांडानंतर तब्बल २७ वर्षांनी लिहून पूर्ण झाले. या दरम्यान अन्य कांडे लिहिली गेली. श्री समर्थ रामदास स्वामी लिखित वाल्मिकी रामायणास रा.रा. आणि दाक्षिणात्य वाल्मिकी रामायणास दा.रा. असा पुढे संक्षेपाने उल्लेख केला आहे.

रा.रा. व दाक्षिणात्य अयोध्याकांड यांचा तौलानिक अभ्यास –

रा.रा. हा रामेण रामदासेन लिखितं वाल्मीकिरामायणं यासाठी तर दाक्षिणात्य वाल्मीकिरामायणं यासाठी दा.रा. संक्षेप स्वीकारलेला असून या दोहोंचा अभ्यास करताना पुढील घटकांचा विचार केला आहे. दोन्ही रामायणातील सर्गसंख्या, श्लोकसंख्या, सर्गसंगती, अनुपलब्ध सर्ग,संयक्तसर्ग, सर्गनाम इत्यादी.

सर्गसंख्या व श्लोकसंख्या –

श्रीसमर्थ रामदासांनी लिहून काढलेल्या या हस्तलिखित पोथीत अयोध्याकांडात १२२ आहे तर दाक्षिणात्य आवृत्तीत सर्गसंख्या १२० आहे. याविषयी अधिक माहिती पुढील कोष्टक क्र.१ मध्ये आहे

कोष्टक क्र.१

	सर्गसंख्या	श्लोकसंख्या	फरक
रा.रा.	१२२	१२०	०२
दा.रा.	४२७९	४३४५	६६

कोष्टकावरून स्पष्ट होते की श्रीसमर्थांच्या प्रस्तुत पोथीत दोन सर्ग जास्त आहे तर दाक्षिणात्य आवृत्तीची श्लोकसंख्या जास्त असून ६६ श्लोकांचा फरक पडतो. पण मुळात दाक्षिणात्य १२० सर्गांपैकी ११५ सर्गच या हस्तलिखिताशी जुळतात. याचा अर्थ ११६ ते १२० असे ५ सर्ग श्रीसमर्थांच्या अयोध्याकांडात आढळत नाहीत. शिवाय या पोथीतील पहिला सर्ग दाक्षिणात्य शाखेचा बालाकांडातील ७७वा सर्ग आहे अर्थात याविषयी सविस्तर माहिती पुढे सर्गसंगती मध्ये सांगितले जाईल. तेथे स्थूलमानाने दिसून येणारी भिन्नता नमूद केली आहे. दाक्षिणात्य आवृत्तीतील ११५ सर्गांमध्येसुद्धा रा.रा.१५ सर्ग सापडत नाही.

सर्गसंगती –

श्रीसमर्थांच्या या पोथीतील श्लोक व दाक्षिणात्य आवृत्तील श्लोक जेथे जुळतात त्या त्या सर्गांची संगती जुळते ती क्रमवार माहिती पुढील कोष्टक क्र.२ मध्ये दिलेली आहे. ही क्रमवारी श्रीसमर्थरामदास स्वामींच्या हस्तलिखितातील सर्गक्रमानुसार आहे. कोष्टकातील संख्या ही सर्ग क्रमांक दर्शविते.

कोष्टक क्र.२ अ

रा.रा.	दा.रा.	रा.रा	दा.रा.
१	१.७७.१५	१३	१०-११
२	***	१४	१२
३	१.७७./२.१	१५	१३
४	२	१६	१४
५	३	१७	१४
६	४	१८	१५
७	५	१९	१६
८	६	२०	१७
९	७	२१	१८-१९
१०	८	२२	२०
११	९	२३	२१
१२	९	२४	२२

रा.रा.	दा.रा.	रा.रा.	दा.रा.
२५	२३	३९	३४
२६	***	४०	३६
२७	***	४१	३७
२८	***	४२	***
२९	२४	४३	३९
३०	२५	४४	४०
३१	२६	४५	४१
३२	२७	४६	४२
३३	२८-२९	४७	४३
३४	३०	४८	४५
३५	३१	४९	४६
३६	३२	५०	४८
३७	३३		
३८	***		

कोष्टक क्र.२ ब

रा.रा.	दा.रा.	रा.रा	दा.रा.
५१	४९-५०	६७	६४
५२	५१	६८	६५
५३	५२	६९	६६
५४	***	७०	६७
५५	५३	७१	६८
५६	५४	७२	६९
५७	५६	७३	७०
५८	५७	७४	७१
५९	५८	७५	७२
६०	५९	७६	७३
६१	६०	७७	७४
६२	६१	७८	७८
६३	***	७९	७५
६४	४४	८०	***
६५	***	८१	***
६६	६३	८२	८१

रा.रा.	दा.रा.	रा.रा.	दा.रा.
८३	***	९३	***
८४	७७	९४	८६
८५	***	९५	८७
८६	७९	९६	८८
८७	८०	९७	८९
८८	८२	९८	९०
८९	८२	९९	९१
९०	८३	१००	९२
९१	८४		
९२	८५		

कोष्टक क्र. २ क

रा.रा.	दा.रा.	रा.रा.	दा.रा.
१०१	९३	११३	१०६
१०२	९४	११४	१०७
१०३	९५	११५	१०८
१०४	प्रक्षिप्त	११६	१०९
१०५	***	११७	११०
१०६	९७	११८	१११
१०७	९९	११९	११२
१०८	१००	१२०	११३
१०९	१०२	१२१	११४
११०	१०३	१२२	११५
१११	१०४		
११२	१०५		

वरील कोष्टक क्र.२ अ, ब आणि क यांचा साकल्याने विचार करता असे लक्षात येते की, दाक्षिणात्य शाखेचे ११५ सर्गच या प्रस्तुत हस्तलिखित पोथीशी जुळतात. त्यातही १ व ३ सर्ग दाक्षिणात्य शाखेच्या बालकांडातील ७७ सर्गाचा भाग आहेत. तर दुसरा सर्ग दाक्षिणात्य पाठात सापडत नाही. दाक्षिणात्य आवृत्तीत मुळात १२० सर्ग आहेत त्यामुळे ११६ ते १२० असे पाच सर्ग या हस्तलिखितात आढळत नाहीत. प्रस्तुत हस्तलिखितातील १२२ सर्गांपैकी १०७ सर्गच दाक्षिणात्य आवृत्तीशी जुळतात व १५ सर्ग दाक्षिणात्य आवृत्तीत सापडत नाहीत.

अनुपलब्ध रा.रा.सर्ग –

श्रीसमर्थांच्या हस्तलिखित पोथीत १२२ सर्गांपैकी १०७ सर्ग दाक्षिणात्य आवृत्तीत उपलब्ध होतात तर अनुपलब्ध होणारे सर्ग पुढील कोष्टकात दिले आहेत.

कोष्टक क्र.३

	अनुपलब्ध सर्गक्रम	एकूण
रा.रा.	२,२६,२७,२८,३८,४२,५४,६३,६५,८०, ८१,८३,८५,९३,१०५	१५

अनुपलब्ध दाक्षिणात्य सर्ग –

जसे श्रीसमर्थांच्या प्रस्तुत पोथीतील सर्ग दाक्षिणात्य आवृत्तीत आढळत नाहीत तसे दाक्षिणात्य आवृत्तीतील १४ सर्ग प्रस्तुत हस्तलिखित पोथीत आढळत नाहीत ते सर्ग पुढील कोष्टकात दिलेले आहेत.

कोष्टक क्र.४

	अनुपलब्ध सर्गक्रम	एकूण
दा.रा.	३५,३८,४७,५५,६२,७६,९६,९८,१०१,११६ ते १२०	१५

वरील कोष्टकावरून हे लक्षात येते की १ ते ११५ सर्गांपैकी ९ सर्ग रा.रा. मधील अयोध्याकांडात आढळत नाहीत. ११६ ते १२० यांचा शोध पुढील अरण्यकांडात घ्यावा लागेल. पण प्रस्तुत ठिकाणी दाक्षिणात्य आवृत्तीच्या दृष्टीने १२० सर्गाने अयोध्याकांडाची समाप्ती होते त्यामुळे श्रीसमर्थांच्या या पोथीत १४ सर्ग अनुपलब्ध आहेत.

संयुक्तसर्ग –

प्रस्तुत पोथीत असे काही सर्ग आढळतात ज्यामध्ये दाक्षिणात्य आवृत्तीतील दोन सर्ग एकत्र केलेले आहेत तर याउलट श्रीसमर्थांच्या पोथीतील दोन सर्ग दाक्षिणात्य आवृत्तीत एकाच सर्गात अंतर्भूत केलेले दिसतात. अशा सर्गांना संयुक्तसर्ग म्हंटले आहे त्यांचे कोष्टक रूपात विवेचन पुढीलप्रमाणे

कोष्टक क्र.५

रा.रा. संयुक्तसर्ग			दा.रा. संयुक्तसर्ग		
अनु.	रा.रा.	दा.रा.	अनु.	दा.रा	रा.रा.
१	१३	१०-११	१	१.७७	१ व ३
२	२१	१८-१९	२	२.९	११-१२
३	३३	२८-२९	३	२.१४	१६-१७
४	५१	४९-५०	एकूण	३	६
एकूण	४	८			

वरील कोष्टकावरून स्पष्ट होते की श्रीसमर्थांच्या पोथीतील ६ सर्ग आणि दाक्षिणात्य आवृत्तीतील ८ सर्ग संयुक्त स्वरूपात आहेत. याचा अर्थ असा दाक्षिणात्य तीन सर्ग ६ सर्गात विभागले गेले आहेत तर श्रीसमर्थांच्या पोथीतील ४ सर्ग दाक्षिणात्य आवृत्तीत ८ सर्गात विभागले आहेत. यामध्ये दाक्षिणात्य आवृत्तीत बालकांडाच्या ७७ सर्गाचा समावेश होतो त्यामुळे अयोध्याकांडाचाच विचार करायचा झाला तर दाक्षिणात्य पाठाच्या दृष्टीने रा.रा. पोथीतील केवळ ४ सर्ग संयुक्त आहेत.

सर्गनाम –

विषयानुरूप प्रत्येक सर्गास नाव असणे हे श्रीसमर्थांच्या पोथीचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल, कारण दाक्षिणात्य पाठात कोणत्याही सर्गास नाव दिलेले आढळत नाही. पण येथे "इत्यार्षे श्रीरामायणेऽयोध्याकांडे भरतप्रस्थानो नाम सर्गः" अशा प्रकारे पुष्पिकेत स्पष्ट निर्देश आढळून येतो . काही निवडक सर्गांची नावे कोष्टकात दिली आहेत, विस्तारभयास्तव सर्वच सर्गांची नावे दिलेली नाहीत.

कथा
आणि
जीवनसुत्रे

भारत हे महापुरुषांचे जन्मस्थान आहे, संस्कृती आणि परंपरेची जननी आहे आणि भारतीय म्हणून आम्हाला आमच्या कथांचा अभिमान आहे. या पुस्तकात भारतातील नऊ शक्तिशाली, प्रभावशाली व्यक्तींच्या कथा आहेत - या उत्कटतेच्या, देशभक्तीच्या, शौर्याच्या, भक्तीच्या, त्यागाच्या आणि विश्वासाच्या कथा आहेत. अशा कथा ज्या तुमच्या चेतनेवर कायमचा ठसा उमटवतील आणि तुमच्या जीवनाचा एक भाग होतील.



विराट चिरानिया

अनुवाद - तनुजा शाह

किंमत - ₹ ३७५/-



श्री समर्थ रामदास स्वामींनी बालवयात टाकळी येथील तपश्चर्येच्या काळात स्वहस्ते लिहिलेल्या वाल्मिकी रामायणातील हस्ताक्षर.

कोष्टक क्र.६

सर्गक्रमांक	सर्गनाम	बाड पृ.क्र.
१	भरतप्रस्थानः	२
३	प्रकृतिसमागमः	५ अ
१०	मन्थराकैकयीसंवादः	१५
२०	रामाभिगमनम्	३० अ
३०	रामस्वस्त्यनः	४२ अ
४०	सिद्धार्थवचनम्	५४
५०	पुरस्त्रीणां विलापः	६४
६०	दशरथविलापः	७७ अ
७०	मन्त्रविचारः	८९ अ
८०	वसिष्ठवाक्यम्	९९ अ
९०	गंगातीरभरतसेनानिवेशः	१०७ अ
१००	भरतप्रयाणः	११९ अ
१२०	भरतोऽयोध्यायां प्रवेशः	१३९
१२२	नन्दिग्रामे भरतनिवासः	१४१

वरील कोष्टकात दिलेले पाठ यथामूल दिलेले आहेत. त्यामुळे रामस्वस्त्यनः, भरतोऽयोध्यायां प्रवेशः यासारखे अशुद्ध पाठ आढळतात. याशिवाय सर्ग क्रमांक १५,२९,३२,३७,३८,८७ या ६ सर्गांना नावे दिलेली नाहीत. त्यामुळे १२२ सर्गांपैकी ११६ सर्गांना नावे दिलेली आढळतात.

सारांश –

श्रीसमर्थ रामदास स्वामींनी लिहिलेली ही अयोध्याकांडाची पोथी दाक्षिणात्य आवृत्तीशी ताडून पाहिल्यानंतर पुढील मुद्दे विशेषत्वाने समोर येतात.

- दाक्षिणात्य आवृत्तीतील १०७ सर्गच या पोथीशी जुळतात.
- दाक्षिणात्य आवृत्तीतील श्लोक जसेच्या तसे जुळत नाहीत.
- रा.रा.मधील १५ सर्ग आणि ४९३ श्लोक दा.रा.मध्ये आढळत नाहीत.
- रा.रा.मधील ४ सर्ग संयुक्तसर्ग आहेत, तर दा.रा.चे ३ सर्ग रा.रा.मध्ये ६ सर्गांमध्ये विभागले आहेत.
- रा.रा.मध्ये केवळ ६ सर्गांचा अपवाद वगळता प्रत्येक सर्गाला विषयानुरूप नाव आहे.
- रा.रा.च्या ३ सर्गापासून दा.रा.च्या अयोध्याकांडाची सुरवात होते.
- भरताचे नंदिग्राम येथे वास्तव्य येथे श्रीसमर्थांचे अयोध्याकांड संपते, तर यापुढील वृत्तांत दा.रा. मध्ये ११६-१२० या सर्गात आढळतो.

थोडक्यात असे स्पष्ट होते की श्रीसमर्थ रामदास

स्वामींनी दाक्षिणात्य आवृत्तीवर आधारित ही पोथी लिहिलेली नाही. याहून भिन्न शाखेची पोथी त्यांच्या समोर असेल. पण दाक्षिणात्य पाठांचा काही प्रमाणात समावेश त्यातच निश्चितच आढळून येतो. त्यामुळे या श्रीसमर्थांच्या हस्तलिखित पोथीचा अजून चिकित्सात्मक अभ्यास होणे आवश्यक आहे.

संदर्भग्रंथसूची

1. अयोध्याकांड, बाड क्र.६९४, श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर, धुळे
2. बालकांड, बाड क्र.६९४, श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर, धुळे
3. रामेण रामादासेन लिखितं वाल्मीकिरामायणम् बालकांडम्, श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर, धुळे, सन २०१४
4. रामेण रामादासेन लिखितं वाल्मीकिरामायणातील आदिकांड व दाक्षिणात्य वाल्मीकिरामायणातील बालकांड यांचा तौलनिक अभ्यास, प्रा. नीलेश जोशी, नवभारत,वाई,जि. सातारा, महाराष्ट्र, नोव्हेंबर२०१२.
5. वाल्मीकिरामायणम्, अयोध्याकाण्डम्, द्वितीयभागः, तिलक-शिरोमणि-भूषणटीकायुक्तम्, परिमलप्रकाशनम्, देहली, २००८
6. वाल्मीकिरामायणम्, प्रथमखण्डः, गीताप्रेस गोरखपुर, सं.२०६७

– डॉ. निलेश जोशी

एम. ए. संस्कृत, नेट, सेट, पीएचडी

आय. आय. टी. मुंबई येथे वरिष्ठ भाषातज्ञ म्हणून कार्यरत.

शहरनामा



जगातील मोठी, नवाजलेली शहरे पाहण्याची, आणि त्या शहरांची वैशिष्ट्ये जाणून घेण्याची अशी इच्छा सर्वांनाच असते. "शहरनामा" पुस्तकातून अशा १५ जागतिक शहरांची virtual tour आपण करणार आहोत. या शहराची पूर्ण ओळख करून घ्यायची असेल तर "शहरनामा" वाचायलाच हवे !

अनिल वाळिंबे

किंमत – ₹२३०/-